**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या**
**सकाळी ०७.१० वा.**
**रविवार, १८ मार्च २०१८**

**ठळक बातम्या**

- उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट आधारभूत किंमत शेतकऱ्यांना देण्याचा केंद्राचा विचार.
- पुण्यात दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या तीन बांग्लादेशी नागरिकांना अटक.
- गोंदिया जिल्हा परिषदेच्या शाळा प्रवेश नोंदणी मोहिमेला चांगलं यश.
- २० षटकांच्या क्रिकेटमध्ये आज भारत आणि बांग्लादेशदरम्यान अंतिम लढत.

*****

**पंतप्रधान**

शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट, आधारभूत किंमत सरकार निश्चित करेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांना घोषित केलेली किमान आधारभूत किंमत मिळेल याची खात्री करण्यासाठी केंद्र राज्यांसोबत काम करत असल्याचं त्यांनी नवी दिल्लीत वार्षिक कृषी उन्नती मेळाव्यात काल बोलताना सांगितलं. उत्पादन खर्चांमध्ये मजुरी, यंत्रसामग्रीचं भाडं, बियाणं, खतांची किंमत आणि जमिनीचं भाडं यांचा समावेश राहील. शेतकऱ्यांसाठी अनेक आधुनिक ॲप्स सुरु करण्यात आली असून नव्या तंत्रज्ञानामुळं त्यांना उत्पादकता वाढवण्यात मदत मिळेल असं मोदी म्हणाले. शेतकऱ्यांनी शेतातील चारा-कस्पट जाळू नये, युरियाचा वापर कमी करावा आणि खाद्यतेलाची आयात कमी करण्यासाठी तेलबियांचं उत्पादन वाढवावं, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. यावेळी १३ राज्यांतील नियोजित २५ कृषी विज्ञान केंद्रांची कोनशिला मोदी यांच्या हस्ते बसवण्यात आली आणि "जैविक खेती" पोर्टलचंही उद्घाटन करण्यात आलं.

*****

**बियांत सिंग – हत्या**

पंजाबचे माजी मुख्यमंत्री बियांत सिंग यांच्या हत्येच्या आरोपावरुन जगतार सिंग तारा याला आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा चंडीगढच्या अतिरिक्त सत्र न्यायालयानं काल सुनावली. सीबीआयनं तारा याला मृत्युदंड देण्याची मागणी केली होती. बियांत सिंग आणि अन्य १७ जण चंडीगढमधील सचिवालयाच्या बाहेर ३१ ऑगस्ट १९९५ रोजी मानवी बॉंबच्या स्फोटात ठार झाले होते. आपण या शिक्षेविरुद्ध अपिल करणार नाही, असं ताराचे वकील आणि कुटुंबिय यांनी सांगितलं.

*****

**सोनिया गांधी**

काँग्रेस कार्यकर्त्यांनी देशासाठी कोणताही त्याग करायला तयार राहावं, असं आवाहन माजी पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांनी काल पक्ष कार्यकर्त्यांना केलं. काँग्रेस हा राजकीय शब्दप्रयोग नव्हे तर ती एक चळवळ आहे, असं त्यांनी पक्षाच्या दोन दिवसीय अधिवेशनात काल नवी दिल्ली इथं बोलताना सांगितलं.

*****

**बांग्लादेशी अटक**

दहशतवाद विरोधी पथकानं काल पुण्यातून तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली. बांगलादेशमधल्या अन्सारउल्लाह बांग्ला टीम दहशतवादी संघटनेच्या कार्यकर्त्यांना या लोकांनी आश्रय दिल्याचा त्यांच्यावर संशय आहे. वानवडी भागात ते बेकायदेशीररित्या राहात होते. त्यांच्याकडे बनावट कागदपत्रंही सापडली आहेत. या तिघांना २९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

*****

**सी-डॅक - पुणे**

प्रगत संगणन विकसन केंद्र अर्थात सी-डॅकनं विकसित केलेली ४ नवीन तंत्रज्ञानं आपल्या गुढीपाडवा या 'स्थापना दिना'च्या निमित्ताने सी-डॅकचे महासंचालक डॉक्टर हेमंत दरबारी यांनी काल माध्यमांसमोर सादर केली. यात एसडीएन, तारा, लाकूड उद्योगाच्या परवान्यांसाठी ऍप आणि कमी किंमतीचे शैक्षणिक फलक ही भविष्यवेधी नवी तंत्रज्ञानं यंदा विकसित करण्यात आली आहेत. आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

**व्हॉईस कास्ट**

यातील एसडीएन ऑनलाईन हे ओपन सोर्स प्रकारचं तंत्रज्ञान एसडीएन अप्लिकेशन्सवर प्रयोग आणि त्यांचा विकास करणं, त्यातील दोष काढणं, इत्यादि कामी उपयुक्त ठरणार आहे. 'तारा' या छोट्या संवाद उपकरणाच्या माध्यमातून उपग्रहाच्या बिनतारी संवादात येणाऱ्या अडथळयांवर मात करता येणार असून याचा उपयोग मुख्यत्वे ईशान्य भारत आणि डोंगराळ भाग आणि जंगले या ठिकाणी संवादासाठी होणार आहे. तिसऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग  लाकूड उद्योगातील विविध परवाने आता तीन महिन्यात मिळवण्यासाठी करता येणार आहे. चौथ्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सध्या बाजारात मिळणाऱ्या शैक्षणिक फलकांपेक्षा कमी किंमतीचे फलक सी- डॅकनं विकसीत केले आहेत. इलेक्ट्रॉनिक सिस्टीम डिझाईन क्षेत्राला कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात हे फलक उपयोगी ठरणार आहेत.

*****

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत काल विद्यापीठाचा २०१८-१९ या वर्षाचा ६शे ४९ कोटींचा अर्थसंकल्प व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी सादर केला. दूरशिक्षणासाठी मुक्त अध्ययन संकुल, विद्यापीठाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवणे, विद्यापीठाच्या आवारात नियोजनबद्ध उद्याने आणि बांधकामं निर्माण करणं, कायमस्वरूपी भव्य पदवीप्रदान सभागृह उभारणं, संशोधन आणि गुणवत्ता, सॉफ्ट स्कील प्रोग्राम, प्रशासकीय सेवकांसाठी कल्याणकारी योजना इत्यादींसाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे.

*****

अमरावती

अमरावती विभागात सरासरीपेक्षा २४ टक्के कमी पाऊस झाल्यानं ४६ तालुक्यांची भूजल पातळी १० फूट खोल गेली असल्याचा सर्वेक्षण विभागाचा अहवाल आहे. १ हजार ३११ गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. ही समस्या कशाप्रकारे हाताळण्यात येत आहे या विषयीचा अधिक वृतांत आमच्या प्रतिनिधीकडून...

अमरावती विभागात टंचाईचा सामना करण्यासाठी तीन जिल्ह्यांमध्ये ७१ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. विभागात एकुण मोठे प्रकल्प आणि लघु प्रकल्प असे एकुण ४८४ प्रकल्प आहेत. यात सध्या पुर्ण संचयन पातळीच्या २५ टक्केच साठा शिल्लक आहे. विभागात १८ तालुक्यांतील ८५ गावांमध्ये तीन टँकरने पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये सर्वाधिक ५६ गावे अकोला जिल्ह्यातील आहेत. या गावामध्ये ४२ टँकर, यवतमाळ जिल्ह्यात १७ टँकर, बुलडाणा जिल्ह्यात १२ टँकरने पाणी पुरवठा होत आहे. या महिन्याअखेर आणखी ५० टँकर वाढतील असा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे. विभागात एप्रिल ते जून या कालावधीत ११५ गावामध्ये ८८४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येणार आहे. विहिरींचे खोलीकरण, नळ योजनांची विशेष दुरुस्ती, नवीन विंधन विहिरी इत्यादी कामे करण्यात येणार आहे.

प्रतिनिधी – आनंद गंभीर, अमरावती.

*****

गुढीपाडवा

आज गुढी पाडवा. मराठी नववर्षाचा पहिला दिवस. चैत्र मास आणि श्री शालिवान शके १९४०चाही आजपासून प्रारंभ होत आहे.

आजपासून संपूर्ण राज्यात प्लास्टिक आणि थर्माकोलच्या वस्तूंवर बंदी घालण्याचा निर्णय लागू होत आहे. यामध्ये प्लास्टिकपासून बनविल्या जाणाऱ्या पिशव्या, थर्माकोल आणि प्लास्टिकपासून बनविण्यात येणाऱ्या एकदाच वापरण्याच्या वस्तू म्हणजे ताटं, कप, थाळया, पेले, काटे, वाटी, चमचे, स्ट्रॉ, कटलरी, स्प्रेड शीट्स, प्लास्टिक पाऊच, पॅकेजिंग, सर्व प्रकारचं प्लास्टिक वेष्टण, यांचा वापर, साठवणूक, वितरण, घाऊक आणि किरकोळ विक्री, आयात आणि वाहतूक करण्यास राज्यात संपूर्ण: बंदी असणार आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेद्वारे गुढी पाडव्यानिमित्त २०१५ पासून सुरु केलेल्या शाळा प्रवेश नोंदणी मोहिमेला चांगलं यश मिळत आहे. २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीमध्ये ३ हजार ७००, २०१५-१६ मध्ये १० हजार २० तर २०१७-१८ या वर्षासाठी १३ हजार विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला. गोंदियाचे तत्कालिन जिल्हाधिकारी डॉक्टर विजय सूर्यवंशी यांच्या पुढाकाराने “गुढी पाडवा शाळा प्रवेश वाढवा” या नावाची ही मोहीम सुरु करण्यात आली होती.

*****

**साहित्यिक गुढी**

**रत्नागिरीच्या जनसेवा ग्रंथालयानं काल रत्नागिरीत साहित्यिक गुढी उभारून गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला नववर्षाचं स्वागत केलं.**

*********

**क्रिकेट**

**वीस षटकांच्या सामन्याच्या तिरंगी मालिकेतील अंतिम लढत आज श्रीलंकेत कोलंबो इथं भारत आणि बांगलादेश या क्रिकेट संघांमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरू होईल. या मालिकेत बांगलादेशविरुद्ध दोन आणि श्रीलंकेविरुद्ध एक असे सलग तीन सामने जिंकल्यानं भारताला अंतिम लढतीतही विजयाची अपेक्षा आहे.**

*********

**हवामान**

**उद्या सकाळपर्यंत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. तर कोकण आणि विदर्भात प्रामुख्यानं कोरडं हवामान राहील.**

*********